CMYK

सुविचार
वाचन हे ज्ञानाच्या सागराचे द्वार आहे.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com



नूतन एसपीसमोर राष्ट्रीय महामार्गावरील लुटमारीवर नियंत्रण आणण्याचे आव्हान
पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 106 ■ वर्ष 2 रे ■ सोमवार दि.26 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# दिल्लीच्या प्रवाशांची ट्रॅव्हल्स लुटली, ६ लाखाचे दागिने लंपास, लुटमार थांबेना: येरमाळा पोलिसांकडून चोरी लपविण्याचा प्रकार

## चोरट्यांनी ट्रॅव्हल्सच्या कॅरिअरवरून बॅगा पळवल्या, येरमाळा पोलिस म्हणाले,बॅगा गहाळ झाल्याची तक्रार द्या

### दरोडे,चोरीच्या घटनांनी जिल्ह्यात दहशत

सोमनाथ बारकुल | आरंभ मराठी

येरमाळा-दिवसाढवळ्या होणारी लुटमार, चोऱ्या, दरोड्याच्या घटनांनी जिल्ह्यात दहशत निर्माण झाली आहे. नूतन पोलिस अधीक्षक रितू खोकर यांच्यासमोर जणू चोरट्यांनी आव्हान उभे केले आहे. शुक्रवारी सोलापूर-धुळे महामार्गावर ट्रकमधील ५० कट्टे चोरीची घटना ताजी असतानाच रविवारी पहाटे सहा वाजेदरम्यान दिल्ली येथील पर्यटकांच्या ट्रॅव्हल्सवरील बॅगा व बॅगेतील तब्बल सहा लाखाचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचा प्रकार घडला आहे. विशेष म्हणजे लुटमार झाली नाही, असे दाखविण्यासाठी येरमाळा पोलिसांनी दागिने गहाळ झाल्याची तक्रार द्यायला लावली आहे. त्यामुळे असे प्रकार किती दिवस लपविण्याचा पोलिस प्रयत्न करणार,असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सदरील प्रकरणात पोलिसांनी फिर्यादीच्या अर्जानुसार एफआयआरमध्ये नेहमीप्रमाणे जशा तक्रारी घेण्यास टाळाटाळ केली जाते.त्याचप्रमाणे अर्जानुसार नोंद न घेतल्याचा प्रकार समोर आला आहे.त्यामुळे महामार्गावर होणारी लुटमार लपविण्याचा पोलिसांचा प्रताप संतापजनक आहे.फिर्यादीच्या लेखी अर्जावर मलबीन मॅथ्यू यांच्या म्हणण्यानुसार रविवारी सकाळी सहा वाजेदरम्यान ते कुटुंबासोबत प्रवास करत असताना तीस ग्रॅम वजनाची चैन, सोळा ग्रॅम वजनाची चैन,सहा ग्रॅम वाजनाच्या तीन सोन्याच्या चैन, सोळा ग्रॅम वजनाची एक सोन्याची बांगडी,चार ग्रॅम वजनाची अंगठी,तीन जोडी सोन्याच्या कानातले तीन जोड, असे एकुण ८० ग्रॅम म्हणजेच अंदाजे ६ लाख रुपयाचे दागिने पडुन गहाळ झाल्याचे म्हटले आहे. असे असले तरी चोरी जाऊनही गहाळ झाल्याचे लिहायला पोलिसांनी का सांगितले असा, असा प्रश्न निमाण होतो. प्रत्यक्षात लेखी अर्जावर अर्ज स्विकारल्याचा पोलीस ठाण्याचा शिक्का असून, पोलिसांनी प्रत्यक्षात एफआयआरमध्ये नोंद केली नाही.प्रत्यक्षात पोलिसांनी नोंदवलेल्या फिर्यादित दिल्ली येथील दिलशान कॉलिनी,शहादरा येथील मलबीन एम. एम.मॅथ्यू यांच्या फिर्यादित रविवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास चोराखळी येथील नवीन पेट्रोल पंपात डिझेल भरत असताना पारगाव टोलनाक्यापासुन अरबानिया ट्रॅव्हल्सच्या (डी.एल.१ व्ही.सी.५४४६) कॅरिअरवरुन बॅगा गायब झाल्याचे समजले. दोन सफारी बॅगा,एक सूर्या सिल्क,दोन प्रवाशी बॅग, एक हॅन्ड बॅग,दोन ब्राऊन बॅग,जांभळ्या रंगाची सफारी बॅग, तीन निळ्या बॅग,पांढऱ्या निळ्या रंगाची बॅग,एक सुटकेस,अशा चौदा बॅग मुलाचे होळी कामोनिया सर्टिफिकेट कपडे, दागिने अंदाजे नोंद केलेली नाही.यावरुन पोलिसांनी मात्र लेखी दिलेल्या अर्जानुसार फिर्याद न नोंदवल्याचा प्रकार समोर आल्याने पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. फिर्यादीला बॅगा शोधताना त्यांना एक बॅग मलकापूर पाटीजवळ रोडवर सापडल्याच्या म्हणण्यानुसार हा प्रकारही नाथवाडी पाटीजवळ घडल्याचे निर्दशनास येते.




### वाहने लुटण्याच्या घटना चिंताजनक,

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रात्रीच्या वेळी वाहने लुटण्याच्या घटना चिंता वाढविणाऱ्या आहेत. या महामार्गावर पारगाव ते तुळजापुरपर्यंत चोरटे वेगवेगळ्या ठिकाणी अंधारात दबा धरून बसतात. प्रवासी तसेच मालवाहतुकीच्या वाहनांसमोर जॅक, दगड, लाकडे टाकून वाहने थांबवून लुटमार केली जाते. प्रवाशांना बेदम मारहाण करून अंगावरील दागिने, पैसे लुटले जातात. आंध्रप्रदेशातील काही वाहनांचे अपघात घडवून जखमी झालेल्या प्रवाशांच्या अंगावरील दागिने लंपास करण्यात आले आहेत. वाशी फाट्यावर सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास सोलापूरच्या उप जिल्हाधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना मारहाण करून लुटमार करण्यात आली होती. धावत्या मालवाहू वाहनातून साहित्य चोरण्याचे प्रकार नित्याचेच झाले आहेत. मलकापूर पाटीजवळ तसेच तेरखेडा भागात अनेक घटना घडल्यानंतर पोलिसांनी गस्त सुरू केली होती. त्यानंतर चोरट्यांनी तुळजापूर परिसरातील कावलदरा भागात वाहने लुटण्याचे प्रकार सुरू केले. त्यामुळे पोलिसांनी अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी कठोर कारवाया करण्याचीगरजआहे.

### साहेब म्हणतात,नेमकं काय झालं ते पाहतो

महामार्गावरील चोरीच्या प्रकरणातील दिल्लीच्या लोकांच्या लेखी फिर्यादीनुसार दागिन्याची नोंद एफआयआर का घेतली नाही, अशी विचारणा केल्यानंतर मी सध्या मंदिरावर आलो असून, नेमके काय झाले ते ठाण्यात गेल्यानंतर पाहून सांगतो, असे सपोनि तात्या भालेराव यांनी आरंभ मराठी प्रतिनिधीला सांगितले.

# आखाती देशातील उष्ण कोरड्या वाऱ्यामुळे मान्सूनची महाराष्ट्रातील गती मंदावणार

आरंभ मराठी | धाराशिव

या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे. यावर्षी मान्सून सामान्य तारखेपेक्षा १० दिवस आधीच दाखल झाला आहे. मात्र २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील. सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान ५ जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### मान्सून दाखल झाला असला तरी पुढील वाटचाल खडतर

अरबी समुद्रातील कमी दाब जमिनीवर येऊन जोरदार पाऊस देत आहे. त्याच वेळी बंगालच्या उपसागरात एक चक्राकार स्थिती निर्माण होत आहे ती कमी दाब स्वरूपात उत्तर पश्चिम दिशेला जाईल. आखाती देशांतून जोरदार उष्ण कोरडे वारे वाहू लागले आहेत. पुढील तीन ते चार दिवसांत पाकिस्तान राजस्थान मार्गे भारतात ते वारे दाखल होणार आहेत असा अंदाज आहे. हे उष्ण कोरडे वारे मान्सूनची पुढची वाटचाल अडखळत होण्यासाठी कारणीभूत ठरतील. मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला असला तरी पुढील वाटचाल खुप मंद गतीने होणार आहे असा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई करू नये.


सुरज जयपाल जाधव
हवामान अभ्यासक.

# मुख्यमंत्री रोजगार योजनेच्या मर्यादेत आता १ कोटी रुपयापर्यंतची वाढ

## लाभ घेण्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम () अंतर्गत प्रकल्प मर्यादेत सुमारे १ कोटी रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली असून, या माध्यमातून सूक्ष्म, लघु व सेवा उद्योगांना चालना दिली जात आहे.जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.योजनेमध्ये उत्पादन उद्योगासाठी प्रकल्प मर्यादा ५० लाखांवरून १ कोटीपर्यंत वाढविण्यात आली आहे, तर सेवा व कृषीपूरक उद्योगांसाठी २० लाखांवरून ५० लाखांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. अनुदानाचे प्रमाण पूर्वीप्रमाणेच राहणार असून, अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.या योजनेच्या लाभासाठी १८ वर्षे पूर्ण असलेले कोणतेही व्यक्ती अर्ज करू शकतात,यापूर्वी असलेली वयोमर्यादा देखील हटविण्यात आली असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे. पात्र उद्योगांमध्ये कुक्कुटपालन (अंडी उबवणीसह),व रेशीम उद्योगांचा समावेश करावा यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रह धरला होता, त्यास यश मिळाले असून यासोबतच मधमाशीपालन, ई-वाहतूक, बोट व्यवसाय, मत्स्यपालन, जलक्रीडा, मासेमारी, हॉटेल्स (शाकाहारी व मांसाहारी), होमस्टे, क्लाऊड किचन इत्यादी नवीन प्रकल्पाचा अंतर्भाव झाला आहे.अधिक माहितीसाठी प्रा.किरण आवटे, प्रतिष्ठान भवन, छत्रपती शिवाजी महाराज चौक (धाराशिव) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.



# वधू-वर सूचक मेळाव्यात ५६२ मुले, मात्र केवळ ७९ मुलींचा सहभाग

## मराठा समाजातील विसंगती, तुळजापूरात मराठा मोफत वधू-वर परिचय स्नेहमेळावा

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ मंगल कार्यालयात रविवारी पार पडलेल्या मराठा वधू वर सूचक मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. मात्र यानिमित्ताने समाजातील मुलींची संख्या कमी असल्याचे वास्तव पुन्हा एकदा दिसून आले. मळाव्यात ५६२ मुलानी उपस्थिती लावली तर केवळ ७९ मुलींचा मेळाव्यात सहभाग दिसून आला. त्यामुळे अवास्तव अपेक्षा न ठेवता दोन्ही बाजूंनी विवाहासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अनावश्यक खर्च टाळून, बडेजावपणा टाळला पाहिजे,असा सूर मेळाव्यातून निघाला.'वर्तमानात मुले व मुली उच्चशिक्षित आहेत. लग्नासाठी त्यांच्या व पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे लग्न जुळविताना आजकाल पालकांना बरेच प्रयत्न व संघर्ष करावे लागतात,मुलामुलींच्या अपेक्षा वाढल्यामुळे लवकर लग्न जमत नाही, तसेच वय वाढत जाऊन नंतर तडजोड करावी लागते, तर ही तडजोड वेळीच केली तर अडचण येणार नाही.त्यानुषंगाने राज्यभर मराठा वधु-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असून वधु वर पालकांनी लग्न जुळवितासाठी पैशाचा व्यवहार करु नये असे आवाहन मराठा वधु-वर मेळाव्याचे संयोजन समितीचे सदस्य अशोक गायकवाड यांनी उपस्थित वधु वर व पालकांना केले.महाराष्ट्रभर होत असलेल्या मराठा वधु -वर मेळावा आयोजनात सोशल मिडिया, व्हाट्सअपसारख्या सकल मराठा सोयरिक मंडळ,नातीगोती लग्न ग्रुप,मराठा समाज सोयरिक गृप असे महाराष्ट्रभर जिल्हा निहाय व्हाट्सअप ग्रुप बनवून परिचय पत्राची देवाणघेवाण करीत सध्याच्या युगात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून, त्याचा परिणाम म्हणून सकल मराठा समाज आयोजित मराठा समाज वधु-वर मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मेळाव्यात अनेक ऋणानुबंध जुळतील', असा विश्वास संयोजन समितीने व्यक्त केला. येथील श्रीनाथ मंगल कार्यालयात झालेल्या मेळाव्यास धाराशिव जिल्ह्यासह,पुणे, सोलापूर, लातूर,मुंबई, बिदर,सांगली, सातारा, कोल्हापूर, जिल्ह्यातील बार्शी,खटाव , बारामती,शिरूर तालुक्यातील तसेच पिंपरी-चिंचवड, भोसरी येथील मराठा समाजाचे वधु-वर व पालक सहभागी झाले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठा वधु वर मेळाव्यासाठी संयोजन समितीचे सदस्य तथा पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांनी त्यांचे श्रीनाथ मंगल कार्यालय विनामूल्य उपलब्ध करुन दिले. त्याबद्दल संयोजन समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्धघाटन करण्यात आले.पहिल्या सत्रात वधू-वर नोंदणी व दुसऱ्या सत्रात संयोजन समितीचे अशोक गायकवाड यांच्यासह वधू-वरांनी आपला परिचय करून दिला. मेळाव्याच्या माध्यमातून अनेक विवाह निश्चित होतील, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.यावेळी सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र भोसले, सातारा, सरपं च परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर,युवा नेते कृष्णा रोचकरी,विक्रम पाटील, सरपंच परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्षा झिनत सय्यद,नरेश अमृतराव,अमर मगर, अमर हंगरगेकर,रामेश्वर नन्नवरे, प्रशांत सोंजी, अजय साळुंके आदी मान्यवर उपस्थित होते.मेळाव्या यशस्वीतेसाठी प्रा. अभिमान हंगरगेकर,अशोक गायकवाड, उमाजी गायकवाड, उत्तम (नाना) अमृतराव, नागनाथ (भाऊ)भांजी,अमोल निंबाळकर, अण्णासाहेब कदम,नवनाथ पवार,राजू तांबे,अशोक ठोंबळ,संजय शिंदे,दत्तात्रय घाडगे,अशोक चव्हाण,अर्जुन जाधव,सुहास साळुंके, हनुमंत भालेकर,गोरोबा लोंढे,राहुल जाधव, ॲड.रमेश भोसले,विश्वास मोटे,रमाकांत लोंढे यांनी परिश्रम घेतले.







# काँग्रेसचे ३५ नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार

## राजेश क्षीरसागर यांची कोल्हापुरात माहिती

आरंभ मराठी | कोल्हापूर

काँग्रेसचे १५ नाही तर ३५ नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. टप्प्याटप्प्याने त्या नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश होईल. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पक्षप्रवेशाचा पहिला टप्पा आहे. विरोधकांच्यावर हळूहळू क्षेपणास्त्र डागत जाऊ, असे राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष व आमदार राजेश क्षीरसागर यांनी सांगितले.कोल्हापूर येथे रविवारी पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी, काँग्रेसमधील नाराज नगरसेवकांच्या पक्ष प्रवेशाविषयी स्पष्ट भूमिका मांडली. काँग्रेसचे काही नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत अशी चर्चा सुरू आहे. यासंदर्भात क्षीरसागर यांना प्रश्न केला असता ते म्हणाले, ' शिवसेनेचे पक्ष नेतृत्व हे कार्यकर्त्यांना बळ देणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेहमीच कार्यकर्त्यांना ताकद पुरवली आहे. काँग्रेसचे अनेक नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. केवळ १५ नाहीत तर ३५ नगरसेवक आहेत. शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या त्या नगरसेवकांची यादी तयार आहे. जून महिन्यापासून टप्प्याटप्प्याने प्रवेश होतील. पहिला आठवड्यात काही प्रवेश होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणून आम्ही सक्षमपणे लढविणार आहोत. निवडणूक जिंकण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या सगळ्या करू. साम-दाम-दंड नीतीचा अवलंब होईल. महापालिका निवडणूक ताकतीने लढवू. कोल्हापूरचा महापौर हा शिवसेनेचा असावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शिवसेनेकडे कार्यकर्त्यांची फौज आहे. अनेकजण तीस तीस वर्षे शिवसेनेचा निष्ठावंत म्हणून काम करत आहेत. त्या साऱ्यांच्याकडे मी भावी नगरसेवक या नजरेने पाहत आहे.शिवसेनेचे जिल्हा समन्वयक सत्यजित कदम यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना हद्दवाढ झाली तर निवडणुकीवर बहिष्कार टाकू असे विधान केले होते. त्याकडे लक्ष वेधले असता क्षीरसागर म्हणाले, कोल्हापूरची हद्दवाढ व्हावी यासाठी आपले नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री सकारात्मक आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात हददवाढीविषयी सकारात्मक निर्णय होईल. हद्दवाढ करूनच निवडणूक घ्यावी या मताचा मी ही आहे. मात्र निवडणुकीवर बहिष्कार टाकणे असे म्हणणे उचित नाही. साऱ्यांना बरोबर घेऊन हद्दवाढीचा याचा विषय मार्गी लावला जाईल. ग्रामीण भागातील लोकांनाही विश्वासात घेतले जाईल.'' यावेळी जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण, शिवाजी जाधव, रणजित जाधव, माजी नगरसेवक अजित मोरे, राजू हुंबे, किशोर घाटगे, उदय भोसले, तुकाराम साळोखे, कमलाकर जगदाळे, दुर्गेश लिंग्रस, अंकुश निपाणीकर, मंगला साळोखे, पवित्र रांगणेकर, ज्योती हंकारे, रणजित मंडलिक, अरविंद मेढे, गणेश रांगणेकर, किरण अतिग्रे, बाळासाहेब शेलार आदी उपस्थित होते.

CMYK

# चाकणकरांचा द्वेष योग्य नाही!




मी रूपाली चाकणकर यांची नव्हे तर एका महिलेची बाजू घेणार आहे.त्या आमच्या धायरी गावच्या कन्या आहेत. त्यांची बदनामी आम्ही सहन करणार नाही.एखादी महिला सुंदर असणे हा तिचा गुन्हा आहे का?मग आज तो गुन्हा रूपाली चाकणकर यांनी केला आहे. कारण त्या दिसायला सुन्दर आहेत,असे आम्ही नाही सगळ्या महिलाच टीका करताना म्हणत आहेत आणि महिलाच महिलांच्या दुश्मन असतात हे सगळे बोलतात ते खरे वाटू लागते.त्या कोणती साडी घालतात?, कोणती नेलपेंट लावतात?पायात काय घालतात, हे एवढे लक्ष अचानक गेलेले नाही तर हा द्वेष पहिल्यापासूनच होता. आता त्या द्वेषाला जागा मिळाली आणि टीका सुरू झाली.बरं टीका कोण करतात,तर येथून तेथून सगळ्या महिलाच. अरे त्यांची हौस करायला त्यांचे पती सक्षम आहेत आणि त्या स्वतः स्वतःची हौस करायला सक्षम आहेत,मग तुमच् काय जात ?तुम्ही करा,तो काही गुन्हा नाही,पण नावडतीच मीठ आळणी असा हा प्रकार आहे. त्या तुमच्याकडे काही मागत आहेत का? पण विनाकारण द्वेष करण्यात काही अर्थ नाही,तो आता जाणवत आहेत. एखाद्या व्यक्तीची प्रतिभा आणि प्रतिमा वाढायला लागली की,लोक काही कारण नसताना,काही संबंध नसताना देखील द्वेष करू लागतात.खालच्या स्तरावर जाऊन टीका करू लागतात.या सगळ्यांना काळजी वैष्णवी अथवा मयूरीची नाही तर त्यांच्या आडून यांच्यावर टीका करण्याची संधी यांना सोडायची नाही. त्या बदल्यात राजीनामा मागायचा हे काय कोणाच्या लक्षात येत नाही असे वाटते का?. यात मुख्य विषय बाजूला सारून राजकारण सुरू केले आहे हे सगळे जाणून आहेत.मिडीयाला असले विषय तर हवेच असतात. एखाद घर बांधलं तर बातमी होत नाही, जाळले तर बातमी होते आणि लोकांनाही तेच आवडत असते,पण या सगळ्यात महत्त्वाचा विषय मागे पडतो आहे. विषय काय होता तर वैष्णवी कस्पटे हिच्या हुंडाबळीचा.त्या विषयाबाबत जेवढे करायचे तेवढे शासनाने आणि पक्षाने केले.स्पष्ट भूमिका जाहीर केल्या.हगवणे पिता पुत्राची पक्षातून हकालपट्टी केली. पक्षातील अनेक मान्यवर सांत्वन करायला,धीर द्यायला घरी जाऊन आले. स्वतः अजित पवार भेट देऊन आले.हगवणे पिता पुत्राच्या मुसक्या आवळण्यात आल्या. त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आणि फास्ट ट्रॅकमध्ये खटला चालवण्याचे सांगण्यात आले.जेवढे करायला हवे तेवढे सगळे पक्षाने,आयोगाने आणि शासनाने केले.मग आता राहता राहिला विषय आयोगाच्या मागे लागून रूपाली चाकणकर यांचा काटा काढायचा आणि हे सगळे प्रकर्षाने जाणवू लागले. काही आपले आणि काही परके एकत्र येऊन टीका करू लागले,पण त्यात किती तथ्य आहे हे सगळेजण जाणतात.या विषयाला काही लोकांनी जातीय रंग देण्याचा प्रयत्न केला,तो कितपत योग्य आहे.गुन्हेगाराला जात नसते मग आपण का जातीच्या चष्म्यातून पाहतो?. काहींनी जाणीवपूर्वक स्वतः चुकीचे बोलून आणि बोलायला भाग पाडून,कॅमेरे लावून ठरवून शूटिंग केल्या. त्याच्या बातम्या केल्या,मुद्दाम कॉन्ट्रेव्हर्सी केल्या. स्वतः किती मोठे काम करतोय म्हणून व्हिडिओ लाईक वाढवत राहिले,त्यात वैष्णवीचे पुढे काय हे दिसत नव्हते,अशा वैष्णवी परत घडू नये म्हणून यातील एकही ही काळजी घेताना दिसले नाही.हे सगळे ठरवून असल्यासारखे वाटत होते,याच्या मागे कोणीतरी घडवायला सांगितल्यासारखे हे जाणवत होते.आगामी काळात लोकल बॉडी निवडणुका आहेत.त्यामुळे मुद्दाम पक्षाला नेहमीच डॅमेज करायचे,सातत्याने त्याबाबत आणि इतर विषय खोदून बातम्या लावायच्या,पक्षाची प्रतिमा मलिन करायची,मग पक्षाने निवडणुकीत कोणत्या तोंडाने मते मागायची असे वातावरण काही घडवून आणत आहेत पण लक्षात ठेवा पक्षाला आणि अजितदादांना बदनाम करायचा हा प्रयत्न सगळे जाणून आहेत आणि जनता सुज्ञ आहे. अशी माणसे आणि अशा घटना काय एकाच पक्षात आहेत का? सगळ्या पक्षात हेच आहे आणि त्याला पक्ष आणि कोणी नेता कसा जबाबदार असू शकतो. कोण कसे आहे हे जर तपासात बसले आणि परफेक्ट माणसाचा शोध घ्यायला गेलो तर एकटे फिरावे लागेल. जे राजाभाऊ हगवणे आहेत त्यांचे वडील तुकाराम बुवा हगवणे हे मुळशी मधील प्रतिष्ठित व्यक्ती होते,चांगला माणूस होता,त्यांचा आणि आदरणीय शरद पवार साहेबांचा चांगला संबंध होते. त्यातून राजाभाऊ हगवणे यांना विधानसभेची उमेदवारी मिळाली होती.मग आपण साहेबांना पण दोषी समजणार का?. अनेक नेत्यांचे अनेक लोकांसोबत फोटो असतात,कार्यक्रमात असतात, मग पुढे जाऊन त्या फोटोतील माणसांकडून काही घडले तर यांचा त्यात काय दोष?. आता फोटो काढताना विचारायचे का,''की तू पुढे जाऊन काही करणार असशील तर आता फोटो काढू नको.''यात कोणत्याही पक्षाला,नेत्याला बदनाम करू नये.''जे आपले असतात ते स्पष्टीकरण मागत नाहीत,जे आपले नसतात त्यांना कितीही स्पष्टीकरण द्या, त्याचे समाधान होणार नाही,'' त्यामुळे आपण आपल्या भूमिका प्रामाणिकपणे पार पाडाव्यात,योग्य आणि सर्व ते करावे,नंतर जे होईल ते स्वीकारावे,यापेक्षा वेगळे कोणी काही करू शकत नाही.माझी महिला आयोगाकडे एक तक्रार आहे,महिलेच्या दिसण्यावरून न्याय करणे योग्य आहे का? याबाबत आपणच न्याय द्यावा. महिलांच्या मानसिकता,समाजाची मानसिकता, हुंडाबळी आणि तत्सम अनिष्ट रुढी परंपरा महिला विषयक कायदे याबाबत आयोगाच्या वतीने प्रबोधन सुरू करण्यात यावे ही विनंती..!



राहुल पोकळे,
राष्ट्रसेवा समूह,
धायरी,पुणे

# जंगलांच्या जमिनीवर संस्था उभारणाऱ्या पुढाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाची चपराक



विदर्भातील सहा जिल्ह्यामध्ये असलेल्या झुडपी जंगलांना वनक्षेत्र समजण्यात यावे असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरूवार दिनांक २२ मे २०२५ ला दिला. या जंगलांचा उपयोग शासकीय उद्देश वगळता अन्य कामांसाठी करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यामध्ये झुडपी जंगलांचे क्षेत्र आहे. परंतु, न्यायालयाच्या निर्णयाने रखडलेली विकास कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे. राज्यातील झुडपी जंगलच्या जमीनी जास्तीत जास्त राजकीय पुढाऱ्यांनी मोठ्या शिताफीने हस्तगत केलेल्या आहेत. आज आपण विदर्भात अनेक अभियांत्रिकी महाविद्यालय,शाळा-कॉलेजेस, आश्रम शाळा, धर्मदाय रूग्णालये, अन्य संस्थाने यांच्या नावाखाली राजकीय पुढाऱ्यांनी ९० वर्षासाठी १ रूपयांच्या लिजवर जमीनी घेतलेल्या आहेत आणि आज हेच राजकीय पुढारी या हस्तगत केलेल्या जमिनीला आपल्या मालकीची समजतात. आपण आज जे काही शाळा-महाविद्यालय पहातो ते संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांचे असुन अवाढव्य फी व डोनेशन घेऊन करोडोपती झाल्याचे दिसून येतात व ऐश आरामाची जिंदगी जगत आहेत. परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयामुळे या राजकीय पुढाऱ्यांवर चांगलीच चपकार बसण्याचे संकेत दिसत आहे. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येते.कारण ज्या ठिकाणी निसर्ग बागडत होता त्यावर राजकीय पुढाऱ्यांनी वेगवेगळी संस्थाने उभारून आपला कब्जा केला आहे.परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने निसर्गाला मोकळा श्वास घेण्याची संधी नक्कीच मिळेल असे मला वाटते. झुडपी जंगलातील १९८० नंतरच्या सर्व बांधकामांना अतिक्रमण ठरवत सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांत अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिले आहेत. ''झुडपी जंगल''जमीन वनीकरणाव्यतिरिक्त इतर कामांसाठी वळवण्याबाबत केंद्र आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात तीन महिन्यांच्या आत आपसात सल्लामसलत करण्याचा निर्देश न्यायालयाने दिला आहे.पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने कोणतेही अनधिकृत बांधकामे न्यायालय खपवून घेणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून १२ डिसेंबर १९९६ नंतर झुडपी जंगलाच्या जमिनी वनबाह्य उपयोगासाठी वाटप करण्यात आल्या होत्या याची कारणे आता जमीन वाटप करणाऱ्यां अधिकाऱ्यांना याची यादी द्यावी लागेल. विदर्भात मोठ्या प्रमाणात झुडपी जंगलाची जमीन आहे.ही जमीन महसूल विभागाच्या ताब्यात आहे व तिचा अनेक दशकांपासून आवश्यकतेनुसार रहिवासी, कृषी, सरकारी कार्यालये, सार्वजनिक शाळा,प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी उद्देशाकरीता उपयोग केला जात होता.दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ डिसेंबर १९९६ व दिनांक १३ नोव्हेंबर २००० रोजी आदेश जारी करून कोणत्याही वनजमिनींचा वनबाह्य उपयोग करण्यासाठी वनसंवर्धन कायद्यानुसार केंद्र सरकारची परवानगी घेणे बंधनकारक आहे असे सांगितले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यातील ८६४०९ हेक्टर झुडपी जमिनींचा विकास करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.आज देशातच नाही तर संपूर्ण जगात निसर्ग नामशेष होत आहे यांमुळेच मोठ्या प्रमाणात हवामानात बदल होत असुन भुकंप, सुनामी,हिमकडा कोसळने, ज्वालामुखीचा उद्रेक,वनवे लागने, समुद्राची पातळी वाढने असे अनेक महाप्रलय येत आहे किंवा यापुढे या पेक्षा जास्त विक्राळ रूप धारण करू शकते.त्यामुळे जंगल जेवढे वाचविता येईल तेवढे वाचविले पाहिजे.सर्वोच न्यायालयाच्या निर्णयामुळे वनीकरण मोठ्या प्रमाणात होईल याचा फायदा मनुष्य व जंगलातील संपूर्ण पशुपक्ष्यांना सुध्दा होईल.जंगल वाचविण्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने सरकारला निर्देश दिले की जमीन वन विभागाला हस्तांतरित करण्यासाठी ताबडतोब पावले उचलावीत. सार्वजनिक हिताचा विचार करून जर हे शक्य नसेल तर जागेचे शुल्क वसूल करावे आणि त्याचा वापर वनक्षेत्राचा विकास करण्यासाठी करावा.राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपण आजी-माजी लोकप्रतिनिधी आहात व राज्याच्या ९९ टक्के झुडपी जंगलांच्या जमिनी राजकीय पुढाऱ्यांनी ९० वर्षासाठी १ रूपयांच्या लिजवर घेतल्या आहेत.परंतु वाढते औद्योगिकीकरण व वाढते शहरीकरण यामुळे वनक्षेत्र दिवसेंदिवस ढासळत आहे व कमी-कमी होत आहे आणि वनक्षेत्र वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने झुडपी जंगलांचा योग्य निर्णय घेतला आहे.त्यामुळे झुडपी जंगलांवर कब्जा करणाऱ्यांनी प्रामाणिकपणे सरकारला किंवा वनविभागाला जमीनी परत करावी आणि वनक्षेत्रे वाढविण्यासाठी व वाचवण्यासाठी मदत करावी. विदर्भात जर ८६४०९ हेक्टर क्षेत्रात वनक्षेत्र वाढले तर संपूर्ण विदर्भात हिरवागार गालिचा पसरलेला दिसेल आणि हा विदर्भासाठीच नाही तर देशासाठी एक मोलाचा संदेश समजल्या जाईल.सर्वोच्च न्यायालयाने झुडपी जंगलांच्या बाबतीत घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहेच याचे मी मनापासून स्वागत करतो.परंतु सर्वोच्च न्यायालयाने याही पुढे जाऊन देशातील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेली शेकडो हेक्टर जमीन हस्तगत करून वनक्षेत्राला द्यायला पाहिजे.कारण राज्यासह देशातील राजकीय पुढाऱ्यांच्या एकुण जमीनींचा हिशोब केला तर लाखो हेक्टर जमीन यांच्या घशात आहे यावरही अंकुश लागायला हवे व सरकारने ह्या संपूर्ण जमीनी वनक्षेत्राला देवुन सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण केला पाहिजे यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व सर्वत्र वातावरण प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# वह्या पुस्तके पुरवणं म्हणजे पालकत्व नव्हे



नव्वदच्या दशकात जगभरात जागतिकीकरण झालं.भारतानेही जागतिकीकरणाची वाट धरली. जगामध्ये झपाट्याने बदल होऊ लागले.देशाला कुशल मनुष्यबळ पुरविणारे क्षेत्र म्हणून शिक्षण क्षेत्राचे महत्त्व वाढीस लागले.खेडोपाडी प्राथमिक माध्यमिक शिक्षणाची सोय होऊ लागल्याने सामान्य कुटुंबातील मुले शिकू लागली.शिक्षणाचे वाढते महत्त्व पालकांच्या लक्षात आल्याने मुलींच्या शिक्षणाकडे कानाडोळा करणारा पालकवर्ग मुलींनाही शिक्षणाच्या प्रवाहात सामील करुन लागला.आज आपण पाहिले तर पालक आपल्या पाल्याच्या शिक्षणाबाबत कमालीचा जागरुक झाला आहे.माझा पाल्य उत्तम शिक्षण घेऊन स्वतः च्या पायावर उभा रहावा ही प्रत्येक पालकाची तळमळ असते.यासाठी तो चांगली शाळा निवडतो.आपल्या पाल्याला वह्या,पुस्तके, दप्तर,गणवेश असे शालोपयोगी साहित्य पुरवतो.या वस्तू पुरवल्या म्हणजे आपली जबाबदारी संपली असे होत नाही. शिक्षण ही फक्त चार भिंतींच्या आत चालणारी प्रक्रिया नाही. पाल्याच्या जन्मापासून त्याचे शिक्षण सुरु झालेले असते.शाळेत जाण्याअगोदर मूल ब-याच गोष्टी आपल्या भवतालातून शिकलेले असते.शाळेत त्याचे औपचारिक शिक्षण सुरु होते.आपल्या पाल्याला उत्तम आणि जबाबदार नागरिक बनविण्यासाठी त्यावर आपले वर्तन आणि कृतीतून चांगले संस्कार करा.तसेच खालील काही गोष्टींकडे लक्ष द्या.

१.आपल्या पाल्याला मोठी स्वप्ने पहायला शिकवा.स्वप्ने मोठी असतील तर प्रयत्नही तेवढेच मोठे असतात.
२.यश अपयश पचविण्याची क्षमता निर्माण करा.जीवनाकडे सकारात्मक पहायला शिकवा.
३ वेळेचे महत्व समजावून द्या.वेळ ही कोणासाठी थांबत नाही म्हणून आपण वेळेला महत्व दिलेच पाहिजे हे कृतीतून शिकवा.
४.मुलांसाठी तुमचा वेळ द्या.त्यांच्याशी भरपूर गप्पा मारा.त्यांना समजून घ्या. त्यांच्या अडचणी सोडवा.
५.आपल्या पाल्याची कुवत,क्षमता आणि मर्यादा ओळखा.त्याला पुढे जाण्यास प्रेरित करा. त्यावर आपल्या अपेक्षा लादू नका.
६.आपल्या पाल्याची कुणाशीही अजिबात तुलना करु नका.त्याच्या प्रयत्नाने पुढे जाण्यासाठी तुम्ही त्याला साथ द्या.
७.स्वयंशिस्तीने अभ्यासाची सवय लावा.तो स्वतः हून आवडीने कसा अभ्यास करेल यासाठी प्रयत्न करा.
८.नियमितपणे वाचनाची सवय लावा.त्याचे व्यक्तिमत्व चांगले घडण्यासाठी वाचन खूप महत्वाचे आहे.त्यासाठी त्याला आपल्या अनुकरणातून वाचनाची गोडी लावा.
९.त्याला धाडसी आणि कणखर बनवा.कोणत्याही प्रसंगाला सक्षमपणे तोंड देण्यासाठी तो सजग असला पाहिजे याची जाणीव करुन द्या.
१०.सातत्यपूर्ण परिश्रमाची सवय लावा.आयुष्यात कष्टाचे महत्व समजावून द्या.कष्टाशिवाय या जगात काहीच मिळत नाही हे सांगा.
११.चांगल्या आरोग्यासाठी नियमितपणे व्यायामाची व आहारात सगळे पदार्थ खाण्याची सवय लावा.
१२.मोबाइल,टिव्ही यांचा कमीत कमी वापर कसा करेल याकडे बारकाईने लक्ष द्या.
१३.मान, अपमान,नकार, पचविण्याची क्षमता निर्माण करा.समाजात वावरताना वेगवेगळ्या प्रसंगांना तोंड देण्याची त्याची क्षमता वाढीस लावा.
१४.शाळेतील शिक्षकांशी नियमितपणे भेटून आपल्या पाल्याची प्रगती, उणिवा,समस्या,वर्तन इत्यादी बाबत चर्चा करा.

अशा अनेक गोष्टी आहेत ज्या आपल्या पाल्याच्या जडणघडणीमध्ये आणि एक उत्तम जबाबदार नागरिक बनण्यासाठी आपल्याला करता येतील.

लक्ष्मण जगताप
(लेखक शिक्षक आहेत.)
बारामती

## मुलींच्या वडिलांनो..

हगवणे कुटुंबाच्या दुष्कृत्याने
माणुसकी पुरती ओशाळली
त्यांनी हुंड्याच्या अति लोभाने
अमानुषतेची सीमा ओलांडली

विवाह असतो नयनरम्य सोहळा
वधू पिता असतो हो फार भोळा
मुलीच्या लग्नावर संपत्ती उधळतो
निरोपाच्या वेळी ढसाढसा रडतो

पोटचा गोळा सासरी सुखी राहावा
मुलीच्या सुखाचा येवो सांगावा
यासाठी बाप नेहमीच धडपडतो
मुलीच्या सासरी संपत्ती पाठवतो

हगवणे कुटुंब जणू हावरट माणसे
अतिलोभाने बनली रानटी जनावरे
हुंडाबळीने माणुसकीच थिजली
त्यांची ती क्रुरता गालातच हसली

हगवणे सारखे खूप लोक आहेत
फुकटची संपत्ती मिरवत आहेत
लग्नात हुंडारुपी संपत्ती लुटतात
मग माणुसकी विकायला काढतात

मुलींच्या वडिलांनो सावध व्हा हो
लग्न जमविताना काळजी घ्या हो
संस्कारी गरीबाला मुलगी द्या हो
मुलगी सासरी सुखाने नांदेल हो

– बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.
अहमदपूर
जि.लातूर
.मो.९५४५४४२६४८.

## शकुंतला गंगाधर शिंगाडे यांचे निधन

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव येथील भीमनगर येथील रहिवासी श्रीमती शकुंतला गंगाधर शिंगाडे (वय ८५) यांचे आजारणामुळे रविवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी १.०० वाजता बौद्ध स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात सहा मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे, परतुंडे असा मोठा परिवार आहे. बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय (नाना) शिंगाडे व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे सदस्य विशाल शिंगाडे यांच्या त्या मातोश्री होत.

# भारतीय सैनिकांच्या समर्थनार्थ मुरूम शहरात भव्य तिरंगा रॅली

आरंभ मराठी | मुरुम

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्याचा बदला भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे घेतला. या धाडसी कारवाईच्या पार्श्वभूमीवर देशभरात भारतीय जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने मुरुम शहरातही रविवारी (ता.२५) रोजी सकाळी ९ वाजता शहरातील तमाम देशभक्तांच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.या रॅलीची सुरुवात अण्णाभाऊ साठे चौक येथून झाली. रॅली किसान चौक, हनुमान चौक, अशोक चौक, महात्मा बसेश्वर चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचली. ''भारत माता की जय'', ''शहीद जवान अमर रहे'', ''वंदे मातरम'', ''पाकिस्तान मुर्दाबाद'' अशा जोशपूर्ण घोषणा देत रॅली मार्गक्रमण करत होती. प्रत्येक सहभागीच्या हातात तिरंगा फडफडत होता आणि देशभक्तीने वातावरण भारले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी माजी सैनिक तसेच सध्या सैन्यात कार्यरत जवानांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. राष्ट्रगीताच्या सामूहिक गायनाने या देशप्रेमाच्या रॅलीची सांगता झाली. या भव्य रॅलीचे नियोजन भाजपा उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत मिनीयार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. रॅलीत माजी सैनिक व्यंकट चौधरी, राजेंद्र बेंडकाळे, रूपचंद गायकवाड, देविदास व्हनाळे, शिवशरण वरनाळे, प्रा. दत्तात्रय इंगळे, शरणाप्पा मुदकण्णा, आनंदनगरच्या सरपंच अनिता जाधव, गुलाब डोंगरे, राहुल वाघ, भगत माळी, मनीष मुदकण्णा, अमृत वरनाळे, लखन भोंडवे, डॉ. खाजालाल ढोबळे, अरविंद फुगटे यांच्यासह अनेक माजी सैनिक, सर्वपक्षीय कार्यकर्ते, महिला, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील निलवडे, सिद्धलिंग हिरेमठ, आकाश क्षीरसागर, महेश धुमुरे, बाबुराव बेगमपुरे, सुरेश गायकवाड आदींनी विशेष परिश्रम घेतले. ही रॅली मुरुम शहरातील देशभक्त नागरिकांनी भारतीय सैन्याच्या शौर्याला वंदन करत एकात्मतेचा संदेश देणारी ठरली.

# कळंब तालुक्यात ७० हजार हेक्टरवर होणार सोयाबीनची पेरणी; ७५ हजार क्विंटल सोयाबीन बियाण्याची गरज

## खरीप हंगामाची तयारी सुरु; शेतकऱ्यांची खते आणि बी बियाणे घेण्यासाठी लगबग

हर्षवर्धन मडके | आरंभ मराठी

मोहा – कळंब तालुक्यातील शेतकरी सध्या संकट आणि अपेक्षांमध्ये अडकले आहेत. मागील आठवड्यापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना अडथळा आणला आहे. दरम्यान, मान्सूनने महाराष्ट्रामध्ये प्रवेश केल्याने खरीप हंगाम अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. मात्र खरीपाच्या तयारीसाठी अत्यावश्यक असलेले कृषी सहाय्यक सध्या संपावर असल्याने शेतकरी दिशाहीन झाले आहेत. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू झाली असून, यंदाही सोयाबीन या पिकालाच शेतकऱ्यांची पसंती असल्याचे दिसते.

तालुक्यातील ७८ गावे खरीप क्षेत्रात असून १९ गावे रब्बी क्षेत्रात मोडतात. एकूण लागवडीखालील क्षेत्र सुमारे अडीच लाख एकर असून त्यापैकी दोन लाख एकरांवर खरीप हंगामात शेती होते. कधी काळी कळंब तालुका ज्वारीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. ''ज्वारीचे कोठार'' म्हणून त्याची ओळख होती. त्यानंतर कापूस या नगदी पिकाने या जागी स्थान घेतले आणि तालुका ''कॉटन बेल्ट'' म्हणून ओळखला जाऊ लागला. कापसाकडे झुकलेल्या शेतकऱ्यांनी बोंडअळीच्या प्रादुर्भावाचा फटका बसल्यानंतर ऊस पिकाकडे मोर्चा वळवला. पण ऊस उत्पादनातही अनेकांना फसवणुक अनुभवावी लागली. त्यामुळे शेवटी 'सोयाबीन' हा पर्याय पुढे आला. मागील काही वर्षांपासून सोयाबीनच्या दराने उच्चांक गाठला होता, त्यामुळे शेतकऱ्यांचे मुख्य पीक बनले. कळंब तालुक्यात खरिपासाठी ८० हजार हेक्टर वर पेरणी होणार असून ७० हजार हेक्टर वर सोयाबीनची पेरणी होणार आहे त्यासाठी ७५ हजार क्विंटल सोयाबीन बियाणांची गरज लागणार आहे.

### खते-बियाण्यांची तयारी सुरू, पण कृषी सहाय्यकांच्या अनुपस्थितीची चिंता

तालुक्यात १५० पेक्षा जास्त कृषी निविष्ठा दुकाने आहेत. खत आणि बियाण्यांच्या साठवणीची तयारी सुरू असून, शेतकऱ्यांना योग्य दरात दर्जेदार खते व बियाणे मिळावेत म्हणून कृषी विभाग सतर्क झाला आहे. मात्र, खरीप हंगामात अत्यावश्यक भूमिका बजावणारे कृषी सहाय्यक सध्या विविध मागण्यांसाठी १५ मेपासून संपावर आहेत. कळंब तालुक्यातील ३३ कृषी सहाय्यक या संपात सहभागी असून लॅपटॉप, पदनाम बदल, मदतनीस, आपत्ती पंचनामे यांसारख्या मागण्या त्यांनी मांडल्या आहेत. या संपामुळे महाडीबीटी पोर्टलवरील अर्ज प्रक्रिया, बीज निवड, कीड नियंत्रण, यंत्रसामग्रीसाठी मार्गदर्शन यांसारखी कामे थांबली आहेत. परिणामी शेतकरी महत्वाच्या निर्णयांबाबत संभ्रमात सापडले आहेत.

### शेतकऱ्यांच्या अपेक्षा -लवकर तोडगा निघावा

खते, बियाणे, मशागतीची तयारी सर्व स्तरावर सुरू असली तरी मार्गदर्शनाच्या अभावामुळे शेतकरी संभ्रमात आहेत. कृषी सहाय्यक हे शेतकऱ्यांच्या शेती नियोजनाचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे प्रशासन व संबंधित यंत्रणांनी लवकरात लवकर कृषी सहाय्यकांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढून शेतकऱ्यांना हंगामाच्या पूर्वसंधीला दिलासा द्यावा, हीच शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

# नारंगवाडी परिसरात अवकाळी पावसाचा धुमाकूळ ऊसाला जीवदान तर भुईमूग आणि आंब्याचे नुकसान

आरंभ मराठी |नारंगवाडी

उमरगा तालुक्यातील नांरगवाडी परिसरात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. ऊस हे एक रकमी उत्पादन देणार पीक असल्यामुळे यावर्षी उसाचे प्रमाण वाढल्याने पाणी उपसा मोठ्या प्रमणात झाल्यामुळे परिसरात मार्च, एप्रिल,मे च्या प्रथम आठवड्यात जवळपास ५० बोअरवेल नवीन पाडण्यात आले. मे च्या पहिल्या आठवड्यात भयंकर उकाडा झाल्यामुळे तसेच उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पाणी उपसा मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे परिसरातील जवळपास ९९% बोअरवेल, विहीर बंद पडल्या होत्या. पाण्यासाठी शेतकरीवर्ग कोणी विहिरी खोल करत होते काहीनी बोअरवेल रिबोर केली. पण शेवटी शेतकऱ्यांना फक्त निराशा पदरी पडत होती. पैसा जात होता आणि पाणी ही नसल्याने ऊस वाळत होता त्यामुळे शेतकरीवर्ग मोठ्या संकटात होता. शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत असताना मान्सूनपूर्व पावसाने शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. सगळीकडे हिरवागार ऊस दिसत आहे. अचानक होणाऱ्या व सतत असणाऱ्या पावसामुळे उन्हाळी भुईमूग च्या शेंगा ह्या जागेवर खराब







होत आहेत. आंब्याचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक होणाऱ्या पावसामुळे ओढे, नाल्या भरून वाहू लागले. काही ठिकाणी बंधारे फुटून मोठ्या प्रमणात माती ही वाहून गेली आहे. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने रब्बी हंगामातील ज्वारी ही उशिरा पेरणी झाल्यामुळे ज्वारी पिकाच्या शेतीतील मशागत अद्याप झालेली नाही. झालेल्या पावसाने शेतकरीवर्ग खुष आहे. मोठ्या प्रमणावर उसाला खत व पेरणी साठी बियाण यासाठी धावपळ सुरु आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खत बियाणे उपलब्ध करून देणे कुठेही तुटवडा निर्माण होणार नाही याची प्रशासनाने काळजी घेणे गरजेचे आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाईत अकरा छापे; सव्वादोनशे लिटर गावठी दारू जप्त

आरंभ मराठी | धाराशिव

नवनियुक्त पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.२४) अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत ११ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले सुमारे ३५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव,२२६ लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारूच्या ९४ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. सदर जप्त मद्य यांची एकत्रीत किंमत अंदाजे ५५,८२५ रुपये आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधीत पोलीस ठाण्यात ११ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

## बस प्रवासात साडेतीन तोळे सोन्याची चोरी

आरंभ मराठी | लोहारा

बस प्रवासात एका महिलेचे साडेतीन तोळ्यांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, हिना रियाज बागवान (वय ३१ वर्षे, रा.पांगरी ता. बार्शी) या दिनांक ९ मे रोजी दुपारी दीड ते रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास धाराशिव बसस्थानक ते लोहारा येथे जात होत्या. त्यावेळी प्रवासामध्ये हिना बागवान यांचे ३.५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने अंदाजे ८१,००० रुपये किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले.

# आपत्तीच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांनी सतर्क राहून समन्वयाने काम करावे

## जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांचे निर्देश

आरंभ मराठी | धाराशिव

आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून, जिल्ह्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांनी सज्ज आणि सतर्क राहून समन्वयाने काम करावे असे निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आपत्ती व्यवस्थापनच्या पूर्वनियोजन बैठकीत जिल्हाधिकारी पुजार बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, अपर पोलिस अधीक्षक शफकत आमना, प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी अरुणा गायकवाड, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेलोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) शाम गोडभरले, भुम उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, जलसंपदाचे अधीक्षक अभियंता विजयकुमार थोरात आदी उपस्थित होते.यावेळी पुजार यांनी सांगितले की, यापूर्वी आपत्ती निर्माण झालेल्या गावांची यादी तयार करून तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी त्या गावांची तातडीने पाहणी करावी.या पाहणीअंतर्गत गावातील पायाभूत सुविधा,रस्ते, पूल, पाणीपुरवठा योजनांची स्थिती,तसेच संभाव्य धोके यांचा आढावा




घ्यावा.विशेषतः पूर,अतिवृष्टी यासारख्या आपत्तींचा धोका असलेल्या गावांवर विशेष लक्ष द्यावे,या पाहणीचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील तलावांची पाहणी करून त्यांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत,असे आदेश देण्यात आले आहेत.तलावांच्या बांधकामात त्रुटी असल्यास पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो,ज्यामुळे पूरपरिस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. त्यामुळे तलावांची तपासणी आणि दुरुस्तीचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.यामुळे आपत्तीत होणारे नुकसान टाळता येईल. पुजार पुढे म्हणाले, अग्निशमन दल, पोलिस, महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,आरोग्य विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपत्तीच्या वेळी तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरू करावे, यासाठी प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी पार पाडावी, नागरिकांमध्येही आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करावी,आपत्तीच्या वेळी काय करावे आणि काय करू नये,याबाबत माहिती देण्यासाठी गावागावांत जागृती शिबिरे आयोजित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी पुजार यांनी यावेळी सर्व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना स्थानिक पातळीवर समन्वय साधून आपत्ती व्यवस्थापनाच्या योजना प्रभावीपणे राबवण्याचे आवाहन केले. येणाऱ्या काळात पावसाळा आणि इतर नैसर्गिक

### मुख्यालय न सोडण्याचे आदेश

आपत्तीच्या काळात तत्काळ प्रतिसाद देणे आवश्यक असल्याने सर्व विभागप्रमुख व अधिकारी यांनी पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये. मुख्यालयात उपस्थित राहून आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित कामांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा,असे जिल्हाधिकारी पुजार यांनी स्पष्टपणे सांगितले. जिल्हा प्रशासनाने नागरिकांनाही सतर्कतेचा इशारा दिला आहे.हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार आवश्यक त्या पूर्वतयारी नागरिकांनी करावी.तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे,असे आवाहनही करण्यात आले.

आपत्तींचा धोका लक्षात घेता, सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे.आपत्तीच्या वेळी नागरिकांचे जीव आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी पूर्ण क्षमतेने कार्यरत राहावे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तलाव, बंधारे व जलाशयांची तांत्रिक दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. जलसाठ्यांची स्थिती तपासून संभाव्य धोक्याची पूर्वकल्पना घेऊन काम करावे. संबंधित विभागांनी तलावांची पाहणी करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

# आमदार राणा पाटील यांच्या अडवणुकीमुळे जनता वेठीस

## शिवसेना (उबाठा) शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांची टीका

आरंभ मराठी | धाराशिव

मागील एक वर्षापासून मंजूर रस्ते फक्त आमदार राणा पाटील यांनी अडवणूक केल्यामुळे रखडले. आता जनरेट्यामुळे ही कामे होणार आहेत. त्यात राणा पाटील यांचे २२ कोटी रुपये बुडाल्याने त्यांची पोटदुखी सुरु असल्याची टीका शिवसेना (उबाठा) पक्षाचे धाराशिव शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी रविवारी (दि.२५) पत्रकार परिषदेत केली. यावेळी काँग्रेसचे सिद्धार्थ बनसोडे, सरफराज काझी, राष्ट्रवादीचे बाबा मुजावर, युवासेनेचे रवी वाघमारे, राणा बनसोडे उपस्थित होते. यावेळी गुरव म्हणाले की, १४० कोटीतुन शहरातील मंजूर ५९ डीपी रस्ते अंदाजपत्रकीय दराने होण्याचा अडसर दूर झाला आहे. मग अश्यावेळी महाविकास आघाडीला श्रेय जाणार यामुळे राणा पाटील व त्यांचे समर्थक आता नुसत्या वावड्या उठविण्याची धडपड करत आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात याच मंडळींनी रस्त्याच्या मुद्द्यावरून खासदार व आमदार यांना दोषी ठरविण्याचा प्रयत्न केला होता. पण वास्तव लपून राहत नाही व राणा पाटील यांचा स्वभाव पाहता त्यांना




कुणी चांगल केलेलं पाहवत नाही असा आहे. जनतेला वेठीस धरून यांनी शहर विकास थांबविणाऱ्या राणा पाटलाचा खरा चेहरा उघड झाला आहे. पालकमंत्री यांनी मंजूर केलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या अडीचशे कोटीच्या कामाला यांनीच स्थगिती आणली हे जगजाहीर असल्याचेही गुरव म्हणाले.१४० कोटीच्या कामाला २३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रशासकीय मंजुरी मिळाली. त्यानंतर सात दिवसात निविदा प्रक्रिया राबवणे बंधनकारक होते, तर ९० दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित होते. पण एक वर्ष होऊनही निविदा उघडलीच नाही तेव्हा राणा पाटील व त्यांचे समर्थक काय करत होते असा सवाल गुरव यांनी विचारला. त्यानंतर जनतेच्या हितासाठी महाविकास आघाडीने हा विषय लावून धरला. राणा पाटील किंवा त्यांच्या समर्थकांनी ही कामे सुरु होण्यासाठी कोणाकडे काय पाठपुरावा केला हे त्यांनी दाखवून द्यावे असे आव्हान गुरव यांनी दिले. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी संपूर्ण राज्यात जर सर्व कामे अंदाजपत्रकीय दराने करण्याचा निर्णय घेतला होता असं भाजपची मंडळी सांगत आहेत. मग राज्याच्या ऊर्जा विभागाकडून होणारी कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक कशी? असा सवाल गुरव यांनी उपस्थित केला. जनहिताच्या कामात राजकारण करु नये असे आवाहन सोमनाथ गुरव यांनी यावेळी केले.

# ईट ग्रामपंचायतमध्ये नियोजनाअभावी विकासकामे खोळंबली

## बँक खात्यात विकासनिधी पडून; धोरणाअभावी विकासकामांना बसली खीळ

दत्ता अहिरे | आरंभ मराठी

भूम -भूम तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून नावलौकिक असलेल्या पंधरा सदस्यीय ईट ग्रामपंचायती मध्ये नियोजनाचा अभाव असल्याने नागरिकांना दिल्या जाणाऱ्या प्राथमिक सोयी सुविधा पासून दूर राहावे लागत असल्याचे चित्र दिसत आहे. ईट येथील पाणीपुरवठा योजनेचा नुसता बोजवारा उडाला आहे. पाणीपुरवठा योजना गावापासून जवळपास चार किलोमीटर अंतरावरील मांजरा मध्यम प्रकल्पा जवळ आहे. पाणीपुरवठा योजनेच्या दोन विहिरी गावामध्ये दोन पाण्याच्या टाक्या आहेत. पाणीपुरवठा विहिरीपासून दोन आठ इंची पाईपलाईन थेट पाण्याच्या टाक्याला जोडले आहेत. तर विद्युत पुरवठ्याच्या दोन स्वतंत्र डीपी आहेत. गावात व गाव वस्तीवर नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी गावांतर्गत पाईपलाईनचे जाळे असताना देखील पाणीपुरवठा सुरळीतपणे होऊ शकत नसल्याने ऐन उन्हाळ्यात व पावसाळ्याच्या तोंडावर पिण्याच्या पाण्याची टंचाई सुरू झाली आहे. पाणीपुरवठ्याची पाईप लाईन लिकीज असल्याने महिन्यापूर्वी खोदून काढली. परंतु, अद्याप पर्यंत जोडली गेली नाही. सदर ठिकाणी पाणीपुरवठा लिकेज मधून पाणी वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले. पेरणीची वेळ आली तरी शेतकऱ्यांना जमिनीची मेहनत करता येत नाही. बाळासाहेब हाडूळे यांचा तर एक एकर मधील कांदा खराब झाला आहे.धरण उशाला व कोरड घशाला म्हणण्याची वेळ गावकऱ्यांवर आली आहे.ईट ग्रामपंचायत मध्ये सरपंच व सदस्य यांच्यात ताळमेळ नसल्याने बँक खात्या मध्ये पैसे असून देखील विकास कामावर खर्च केला जात नाही. वित्त आयोगातर्फे विविध विकास कामासाठी शासन स्तरावर निधी दिला जातो. परंतु, आराखड्यातील तरतुदीनुसार अनेक कामाचे एस्टिमेट केले परंतु स्थानिक ग्रामपंचायत सदस्याच्या तक्रारीमुळे पुढे काहीच झाले नाही. वित्त आयोगातील तरतुदीनुसार विद्युतीकरण, रस्ते, नाले, पाणीपुरवठा आदीवर निधी खर्च झोलेला नाही.



### ग्रामपंचायत कारभार चालवतात ग्रामपंचायत अधिकारी

ईट ही तालुक्यातील सर्वात जास्त उत्पन्नाची ग्रामपंचायत असून देखील केवळ सरपंच व सदस्य यांच्यात ताळमेळ होत नसल्याने ग्रामपंचायत अधिकारी यांनी स्वतःच्या खांद्यावर जबाबदारी घेऊन काम सुरू केले आहे. ग्रामनिधीच्या खात्यावरील जमा पैशा मधून जेवढे जमेल तेवढे कामे करण्यात आली. यामध्ये पांढरेवाडी येथील मुरुम टाकणे, पाणी पुरवठ्याच्या मोटार दुरुस्ती पाईपलाईन लिकीज दुरुस्ती चे कामे केली. परंतु ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचे पैसे देण्यास सुद्धा विरोध होऊ लागल्याने ग्रामसेवक यांनी देखील कामे थांबवली आहेत. ग्राम पंचायतचे कोणतेही काम सरपंच व सदस्य मात्र ग्रामसेवकांना भेटा असे सांगून बाजूला होत असताना दिसत आहेत. सध्या शैक्षणिक कागदपत्रे लागत असून देखील ग्रामपंचायत अधिकारी यांची वाट पाहावी लागत आहे.

### कर्मचाऱ्यांच्या पगारी थकल्या

ग्रामपंचायत मध्ये जवळपास दहा कर्मचारी काम करत आहेत. परंतु, त्यांचे तीन ते चार महिन्याचे पगार दिले नसल्याने कामामध्ये अडचणी येत आहेत. याचा परिणाम प्रामुख्याने पाणीपुरवठा योजनेवर होत आहे. नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ईट ग्रामपंचायत मध्ये कोण सत्ताधारी आहे आणि कोण विरोधक आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. ग्राम पंचायत सदस्य व सरपंच एकमेकांच्या तक्रारी करत असल्यामुळे नागरिकांना वाऱ्यावर सोडले असल्याचे चित्र दिसत आहे.

# महामंडळाचे कर्ज वाटप न करणाऱ्या बँकांवर कडक कारवाई करण्यासाठी

## नरेंद्र पाटील यांना निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ धाराशिव जिल्हाच्या वतीने जिल्ह्यातील महामंडळाच्या कर्ज प्रकरणाच्या संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील जिल्हा नियोजन समिती कार्यालयामध्ये बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये जिल्हाधिकारी तसेच नरेंद्र अण्णासाहेब पाटील अध्यक्ष कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य आणि धाराशिव जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अनेक राष्ट्रीयकृत बँका जाणून बुजून महामंडळाच्या कर्ज प्रकरणांना कर्ज देताना टाळाटाळ करत आहेत, अनेकांची कर्ज प्रकरणे मंजूर केली जात नाहीत, महामंडळाच्या हजारो फाइल्स बँकांनी पेंडिंग ठेवलेल्या आहेत अशा प्रकारच्या भावना धाराशिव जिल्ह्यातील अनेक बेरोजगार युवकांनी व्यक्त केल्या होत्या. बेरोजगार युवकांच्या मनात बँकांच्या कर्ज मंजुरी संदर्भात दबून राहिलेल्या प्रश्नांसंबंधी आवाज उठवण्यासाठी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव



च्यावतीने जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका महामंडळाच्या फाईलला कर्ज प्रकरणे मंजूर करत नाहीत अशा नॅशनल बँकांवर शासनाने कठोरात कठोर कारवाई करावी याबाबत जिल्हाधिकारी तसेच नरेंद्र पाटील त्यांच्याशी चर्चा करून निवेदन देण्यात आले. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवचे उपाध्यक्ष अमोल सिरसट, तालुकाध्यक्ष मनोज मोरे, उपाध्यक्ष बबलू भोईटे, शहराध्यक्ष हनुमंत यादव, उपाध्यक्ष आकाश भोसले, रिक्षा समिती कार्याध्यक्ष योगेश अतकरे, धर्मराज सूर्यवंशी, अच्युत थोरात मेजर, आशिष क्षीरसागर, ज्योतीराम काळे, भैरवनाथ रणखांब, अविनाश रणखांब, हनुमंत तांबे, गणेश पवार, लहू शिंदे यांच्यासह समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव....

सोमवार दि.26 मे 2025

# नूतन एसपींसमोर राष्ट्रीय महामार्गावरील लुटमारीवर नियंत्रण आणण्याचे आव्हान

## राष्ट्रीय महामार्गावर मालवाहतूकीसह प्रवाशी गाड्यांची सर्रास लूट

### आठवड्यात घडतात दोन लूटमारीच्या गंभीर घटना

सोमनाथ बारकुल | आरंभ मराठी

येरमाळा –धाराशिव जिल्ह्यातील सोलापूर – धुळे राष्ट्रीय महामार्ग म्हणजे जिल्ह्यातील चालत्या वाहनातून चोऱ्या, चालत्या दुचाकी वरील चैन स्नॅपिंग करणे, चारचाकी वाहने अडवून लूट केली जाणारा रस्ता म्हणुन राज्यात कुप्रसिद्ध झाला आहे. यामुळे दक्षिण, उत्तर भारतातील अनेक राज्यांना सोयीचा जिल्ह्यातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग बदनाम झाल्याने जिल्ह्यातून होणाऱ्या वाहतुकीतील खाजगी वाहने, ट्रॅव्हल्स, मालवाहू वाहनांनी वाहतुकीचा मार्ग बदलला आहे. याचा परिणाम जिल्ह्याच्या दळणवळणासह हॉटेल व्यवसायिकांवर झाला आहे. त्यामुळे लहान मोठ्या व्यवसायिकांचे आर्थिक गणित बिघडले आहे. जिल्हा पोलीस प्रशासनात नव्याने जिल्हाअधीक्षक पदी रुजू झालेल्या रितु खोखर यांच्या पुढील हे आव्हान असुन जिल्ह्याच्या रस्ते वाहतूक विकासातून झालेल्या जिल्ह्याच्या वाहतूक सौंदर्यातील चोऱ्यामुळे बदनाम झालेला चौपदरी राष्ट्रीय महामार्ग चोऱ्यामुक्त महामार्ग करतील का याकडे जिल्ह्यातील वाहनधारकांचे लक्ष लागले आहे.




काही वर्षांपूर्वी जिल्ह्यातील सोलापूर – धुळे राष्ट्रीय मार्गाचे चौपदरीकरण झाले. या रस्त्यामुळे जिल्ह्यातील दळणवळण वाढून जिल्ह्याच्या आर्थिक विकासात भर पडेल असे जिल्हावासियांना वाटत होते. मात्र जिल्ह्याच्या हद्दीतून पारगाव ते धारशीव पर्यंतचा पन्नास किमी अंतराचा हा राष्ट्रीय महामार्ग लुटमारीच्या घटनांमुळे चर्चेत आला. महामार्गावरुन खाजगी वाहनधारकांच्या वाटमारीसह, चालत्या ट्रॅव्हल्स, भाविकांच्या गाडीवरील बॅगा लांबवणे, चालत्या मालवाहू गाड्यातून माल चोरीच्या प्रकाराने बदनाम झाला आहे. दर दिवशी या अंतरात अशी घटना घडली नाही असा दिवस नाही.त्यामुळे दळणवळणातील उत्तरं,दक्षिण भारतील मुख्य,सोयीचा सोलापूर धुळे महामार्ग बदनाम झाल्याने या वाहतूकदारांनी वाहन लुटीच्या प्रकारामुळे आपले वाहतुकीचे मार्ग बदलले आहेत. याचा या रस्त्यावरील पेट्रोल पंप,सुशिक्षित बेकार लोकांनी बँकांची कर्जे काढून येडशी, चोराखळी,येरमाळा,सरमकुंडी,येथे सुरु केलेले हॉटेल व्यवसायासह,चहाचे स्टॉल,गॅरेज,पंक्चर,वाले यांच्यासह थेट आयआरबी कंपनीच्या टोल वसुलीवरही परिणाम झाला आहे. याच मार्गावर जिल्ह्यातील धाराशिव पासुन,येडशीचे रामलिंग मंदिर,पापनाश मंदिर,मलकापूर श्री दत्त मंदिर तीर्थक्षेत्र, येरमाळ्याचे श्री येडेश्वरी देवी मंदिर,भूमचे आलम प्रभू,कुंथलगिरीचे जैन मंदिर या सह बीड जिल्ह्यातील कपिलधार शिवाय उत्तरं भारतातील दक्षिण भारतातील तुरुपती,गाणगापूर,उटी,वृंदावन,तर दक्षिण भारतातील शिर्डी साईबाबा उत्तरं भारत दर्शनसाठी येणाऱ्या भाविकांच्या गाडीवरील बॅगा लांबविल्या जातात.हा एकच मार्ग या पर्यटकांसाठी सोयीचा असल्याने पूर्वी याचं मार्गावरून होणाऱ्या वाहतुकीमुळे जिल्ह्यातील महामार्गावरील व्यवसाय वाहनांच्या होणाऱ्या चोऱ्यामुळे अडचणीत आले आहेत.

### पोलीस प्रशासनाच्या कारभारावर

महामार्गावरील वाहनलुटीचे वाढते प्रकार म्हणजे पिोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहेत. या प्रकारामूळे रस्ते वाहतूक सुरक्षेचा बोजवारा उडाला असुन वाहनलूटीचे प्रकार सऱ्हास वाशी,येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडत आहेत. चोरीच्या तक्रारी वाहनधारक जवळच्या पोलीस ठाण्यात देण्यासाठी आल्यास हद्दीच्या वादात, चौकशीचा ससेमीरा नको म्हणुन तक्रारी घेण्याचे टाळलेते. किती तरी वाहनधारकांच्या तक्रारीही घेतल्या जात नाहीत.

### दिवसेंदिवस चोरीचे प्रकार वाढले

पोलीस प्रशासनात नव्याने रुजू झालेल्या जिल्हा पोलीसअधीक्षक रितु खोखर यांनी पदभार घेतल्याच्या म्हणजे शुक्रवारी,(ता.२३) सकाळी साडेसहा वाजता चालत्या ट्रक मधून सोयाबीनचे एकलाख पासष्ट हजाराचे पन्नास कट्टे बियाणे चोरीची घटना घडली. महामार्गवरील दुचाकी वरील महिलांच्या गळ्यातील दिवसा ढवळ्या चैन स्नॅपिंग प्रकार वाढले आहेत. अशा प्रकारात डिसेंबर महिन्यात एक महिला वनपाल गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती.

### चोरीच्या घटनांचा उलगडा का होत नाही ?

येरमाळा पोलीस ठाण्यात आत्तापर्यंत दाखल असलेल्या भाविकांच्या गाडीवरील लांबवलेल्या बॅगातून दागिन्यांच्या झालेल्या चोऱ्यातील तपास लागलेला नाही. तसेच एकाही चोरीतील मुद्देमाल हस्तगत केलेला नाही. नुकत्याच पार पडलेल्या श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र यात्रेत शेकडो महिलांचे दागिने,शेकडो भाविकांचे मोबाईल चोरी, दुचाकी चोरीच्या घटनेतील एकही तपास महिनभरात लागलेला नाही.

# गरीब आणि श्रीमंतामधील दरी दूर झाल्याशिवाय समाज प्रगत होणार नाही–देवांग

आरंभ मराठी | भूम



समाजातील गरीब – श्रीमंताची दरी दूर झाली तर समाजात चांगल्या स्तरावर नेतृत्व करण्याची संधी मिळेल व निश्चितपणे समाजाची प्रगती होऊ शकते. यासाठी युवकांनी चळवळीत सामील होणे गरजेचे आहे. समाजासाठी वेळ देणे गरजेचे आहे असे मत ऑल इंडिया देवांग देवांगन कोष्टी फेडरेशनचे राष्ट्रीय सचिव विधीज्ञ सचिन देवांग यांनी भूम येथे झालेल्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात बोलताना व्यक्त केले. रविवारी (दि.२५) श्री चौंडेश्वरी मंदिरामध्ये कोष्टी समाज ट्रस्ट व तरुण एकता मंडळाच्या पुढाकाराने इयत्ता १० व १२ वी व पदवी प्राप्त गुणवंत विद्यार्थी, शासकीय सेवेत नव्याने दाखल झालेले, सेवेतील पदोन्नती मिळालेले कर्मचारी, आदर्श कर्मचारी यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला. या प्रसंगी समाज चळवळीतील राष्ट्रीय सचिव विधीज्ञ सचिन देवांग यांनी प्रत्येक समाजाचे महाराष्ट्रामध्ये शक्तिपीठ आहेत, त्या तुलनेत कोष्टी समाज बांधवाचं देखील शक्तिपीठ असावं यासाठी ऑक्टोबर महिन्यामध्ये राज्य स्तरावरचा महामेळावा आयोजित केलेला आहे. या मेळाव्यातून शक्तिपीठाचा मार्ग काढला जाणार त्या अनुषंगाने ध्वजाच देखील अनावरण झालेलं आहे. यापुढील काळात युवा , युवतीने समाज संघटनेसाठी, समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्यातला थोडा वेळ द्यावा, शासकीय स्तरावर उच्च पदस्थ अधिकारी होण्याची संधी मिळालेली आहे त्यांनी देखील समजासाठी थोडा वेळ द्यावा असेही आवाहन केले. या कार्यक्रमातून इयत्ता १० वी व १२ वी तसेच विविध शाखेतील पदवी प्राप्त विद्यार्थी, शासकीय, निमशासकीय सेवेतील पदोन्नती मिळालेले कर्मचारी, आदर्श शिक्षिका यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी अनेक गरजू विद्यार्थ्यांना व्ही बी सदानंदे यांच्या मार्गदर्शनाने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी तेरणा इंजिनिअरिंग कॉलेजचे डिन डॉ. दिगंबर धर्मराज दाते, राज्य पुरस्कार प्राप्त संदीप बागडे, श्रीकांत खामकर , आदर्श शिक्षिका मनीषा ज्ञानेश्वर टकले, उषा महादेव आसलकर , मनीषा राजेंद्र बागडे, प्रकाश बागडे यांची प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमासाठी श्री देवांग कोष्टी समाज चौंडेश्वरी देवी मंदिर ट्रस्ट अध्यक्ष विठ्ठल बागडे, उपाध्यक्ष श्याम तुकाराम वारे, सचिव शंकर खामकर, सदस्य योगेश आसलकर, सागर टकले, गंगाराम भागवत, शंकर म्हेत्रे, ज्ञानेश्वर दाते, शुभम खामकर, सतीश दाते आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल बागडे यांनी तर सूत्रसंचालन शंकर खामकर यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर दाते यांनी मानले.

# लोहारा नगरपालिकेचा घनकचरा मुद्दा पेटणार उपजिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली

अभिजित साळुंके | आरंभ मराठी

लोहारा –लोहारा शहरातील अनधिकृत घनकचरा प्रकल्प हटविण्याच्या मागणीसाठी उद्धवसेनेचे तालुकाप्रमुख अमोल बिराजदार यांनी नगरपंचायत कार्यालयासमोर चार दिवस बेमुदत उपोषण केले. पण ते आंदोलन निष्फळ झाले कारण उपजिल्हाअधिकारी यांच्या आदेशाला झुगारून नगरसेवक यांनी गैरहजरी लावली. त्या अनुषंगाने नगरपंचायत प्रशासनाने खडबडून जागे होत घनकचरा प्रकल्पाच्या जागा निश्चितीसाठी शुक्रवारी विशेष सभा बोलावली होती. परंतु उपनगरध्यक्षासह सर्वच नगरसेवकांनी या विशेष सभेकडे पाठ फिरवली त्यामुळे गणपूर्तीअभावी सभा तहकूब करावी लागली.जल्हा प्रशासनाने प्रकल्पासाठी मार्डी येथील दोन हेक्टर जागा लोहारा नगरपंचायतीला निश्चित केली होती. मात्र, नगरपंचायतीने नागरिकांचा विरोध पत्करून शासकीय धान्य गोदामाजवळ प्रकल्प उभारला. या प्रकल्पामुळे धान्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे उद्धवसेनेचे तालुकाप्रमुख अमोल बिराजदार यांनी बेकायदेशीर घनकचरा प्रकल्प हटवून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी नगरपंचायत कार्यालयासमोर चार दिवस बेमुदत उपोषण केले. त्यामुळे आता या घनकचरा प्रकल्पाला नागरिकांचा विरोध वाढत असल्याने नगरपंचायतीने शुक्रवारी (दि.२३) सकाळी ११ वाजता विशेष सभा बोलावली होती. सभेसाठी नगराध्यक्षा वैशाली खराडे या नगरपंचायत कार्यालयात आल्या. बराच वेळ झाला तरी उपनगरध्यक्षासह एकही नगरसेवक बैठकीला न आल्याने अखेर गणपूर्तीअभावी सभा तहकूब करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली.

### लोहारा नगरपंचायत संख्याबळ

लोहारा नगरपंचायतमध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, दोन स्वीकृत सदस्यांसह एकूण १९ जणांचे संख्याबळ आहे. यापैकी एका जागेची निवड होणार होती. या विशेष सभेत घनकचरा १ प्रकल्पासाठी अंतिम जागा निश्चित करण्यासंदर्भात निर्णय होणार होता. यामध्ये तालुक्यातील मार्डी येथील दोन हेक्टर जागा, लोहारा शहरातील मंजूर विकास आराखड्यातील सर्व्हे क्र. ४४, ४५, ४६ मधील आरक्षित जागा अथवा सद्यस्थितीत वापरात २ असलेली जुन्या गावातील जागा यापैकी एका जागेची निवड होणार होती. यामुळे या सभेत काय निर्णय होणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले होते.

### गणपूर्तीअभावी सभा तहकूब

लोहारा नगरपंचायतच्या विशेष सभेत घनकचरा प्रकल्पासाठी अंतिम जागा निश्चित करण्यासंदर्भात निर्णय होणार होता. पण सभेसाठी नगराध्यक्षा या एकमेव आल्या होत्या. इतर सदस्य न आल्याने सभा गणपूर्तीअभावी सभा तहकूब करण्यात आली आहे. पुढील सभा ही नगरध्यक्षांनी तारीख निश्चित केल्यानंतर घेण्यात येणार आहे.

–मनोज खराडे,
कार्यालयीन अधीक्षक

# शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

## मान्सूनच्या प्रवासाची गती लवकरच कमी होणार

आरंभ मराठी | कोल्हापूर

या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरू असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा दहा दिवस आधीच आहे. मात्र २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील. सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळूहळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान ५ जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर आमदार कैलास पाटील यांच्याकडून कौतुकाची थाप

आरंभ मराठी | येरमाळा

येरमाळा येथील आनंदधात कार्यालयात कै .आबाजी पाटील सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार कैलास पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून नुकतेच आयएएस उत्तीर्ण झालेले पुष्पराज, तहसीलदार दयानंद बिडवे, तहसीलदार सुहास हजारे उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यात दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन पाटील परिवारातर्फे अमोल बापूसाहेब पाटील आणि राहुल रामराव पाटील




यांनी केले होते. माजी सरपंच अंकुशराव आनंदराव पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. कै.आबाजी पाटील सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने पहिल्याच वर्षी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, यापुढे दरवर्षी हा सत्कार सोहळा आयोजित केला जाईल व दरवर्षी कै. आनंदराव भगवानराव पाटील यांचे स्मरणार्थ येरमाळ्यातून इयत्ता दहावी मध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पाच हजार रुपये रोख बक्षीस देण्यात येईल असे प्रतिष्ठानच्या वतीने जाहीर करण्यात आले . यावर्षीचा हा पुरस्कार कु. सानवी सुखदेव बारकुल हिने ९८ टक्के गुण प्राप्त करून मिळविला. या प्रतिष्ठानच्या पुरस्कारामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व स्पर्धा निर्माण होईल अशी उपस्थितांमध्ये चर्चा रंगली होती.

# लाठी काठी व दांडपट्टा स्पर्धेत धाराशिव जिल्ह्याचे दिल्लीत वर्चस्व

## मुरुम येथील गुरुकुल प्रायमरी इंग्लिश स्कूलला मिळाली फर्स्ट चॅम्पियनशिप ट्रॉफी

आरंभ मराठी | उमरगा

दिल्ली येथे आयोजित २ री नॅशनल इंडोर मार्शल आर्ट गेम्स व पहिली लाठी फेडरेशन कप, अग्रवाल भवन बुद्ध विहार न्यू दिल्ली येथे २२ व २५ मे २०२५ यादरम्यान आयोजित स्पर्धेत विविध राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यामध्ये धाराशिव जिल्ह्याच्या खेळाडूंनी लाठी व दांडपट्टा या क्रीडा प्रकारात घवघवीत यश संपादन केले. गुरुकुल प्रायमरी इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी ८ वर्षाखालील मुले गटात देवांश चिलोबा एकम लाठी व द्वे लाठी या खेळ प्रकारात १ सुवर्ण पदक, २ रोप्य पदक व दांडपट्टा मुक्त शैली या क्रीडा प्रकारात १ सुवर्णपदक पटकावले.१० वर्षा खालील मुले मोरया गौतम विधाते २ सुवर्ण पदक, राजवीर बळीराम चौधरी एकम लाठी २ कांस्य पदक, दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, समर्थ सुनिल बायस एकम लाठी १ रोप्या पदक, कांस्यपदक व द्वे लाठी कांस्यपदक या खेळ प्रकारात, १२ वर्षाखालील मुले गणेश विकास पाटील एकम लाठी स्वर्ण पथक व कांस्यपदक, नवाज चांदपाशा मुर्शिद क्रीडा प्रकार एकम लाठी रौप्य पदक, आर्यन व्यंकट जाधव क्रीडा प्रकार द्वे लाठी स्वर्ण पदक, कास्यपदक व फेडरेशन कप रोप्य पदक यांनी दमदार कामगिरी केली.१४ वर्षाखालील मुले श्रेयस धर्मेंद्र मोरे क्रीडा प्रकार एकम लाठी कांस्यपदक फेडरेशन कप, आयुष युवराज पवार क्रीडा प्रकार एकम लाठी १ सुवर्णपदक फेडरेशन कप कांस्यपदक व दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, अनुज विक्रम सूर्यवंशी क्रीडा प्रकार एकम लाठी



२ स्वर्ण पदक व दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक.१६ वर्षाखालील मुले साहिल महंमदरफी शेख क्रीडा प्रकार एकम लाठी, द्वे लाठी स्वर्ण पदक व रोपे पदक व दांडपट्टा मुक्तशैली या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, १८ वर्षाखालील मुले शिवशंकर शंकर आगलावे लाठी क्रीडा प्रकार काठपवित्रा महरुम २ कांस्यपदक, आयान महंमदरफी शेख दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक.८ वर्षाखालील मुली आरोही बलभीम पटवारी क्रीडा प्रकार द्वे लाठी रोप्य पदक, आराध्या संतोष शेटगार क्रीडा प्रकार एकम लाठी सुवर्णपदक व रोप्य पदक, लाव्या नागनाथ वाघमारे क्रीडा प्रकार एकम लाठी स्वर्ण पदक व दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक, प्रत्युषा प्रवीण सोमवंशी क्रीडा प्रकार द्वे लाठी कांस्यपदक.१२ वर्षाखालील मुलीमध्ये स्वरा विलास पाटील क्रीडा प्रकार एकम लाठी कांस्यपदक. आराध्या प्रभाकर जाधव क्रीडा प्रकार द्वे लाठी स्वर्ण पदक व दांडपट्टा क्रीडा प्रकार मुक्तशैली सुवर्णपदक, १६ वर्षाखालील मुली लाठी क्रीडा प्रकार पंचआनिक अनन्या मारुती पांगे, श्रेया जितेंद्र अंकुशे, ईश्वरी प्रकाश माने, अफसाना लाडले मशाक नदाफ, श्रेयशी मारुती शिंदे स्वर्ण पदक, भाग्यश्री केदारनाथ पवार क्रीडा प्रकार लाठी कटपवित्र स्वर्ण पदक व द्वे लाठी कांस्यपदक यांनी यश मिळवले.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांना पदक व प्रमाणपत्र मार्शल आर्टस् गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया चे सचिव व दिल्ली ऑलम्पिक चे सहसचिव दीपक अग्रवाल, लाठी इंटरनॅशनल चे फाउंडर सुभाष मोहिते, लाठी इंडियाचे अध्यक्ष अजय शहा यांच्या उपस्थितीत मिडलवर प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय किसान मोर्चा घालणार आमदारांना घेराव

## शेतमाल हमीभावासाठी विधानसभेत तोंड न उघडणाऱ्या आमदारांचा निषेध







आरंभ मराठी | मुरुड

राज्य सरकारने शिफारस केलेल्या किमतीमधे ४०% वजावट करून केंद्र सरकार हमीभाव घोषित करत आहे. आणि हे वर्षानुवर्षे चालत आलेले आहे. २०२४–२५ चा राज्य सरकारने काढलेला उत्पादन खर्च ६०३९ आहे आणि केंद्राने दिलेला भाव ४८९२ आहे. म्हणजे उत्पादन खर्चापेक्षा कमी. या प्रश्नावर विधानसभेत तोंड न उघडणाऱ्या आमदारांना घेराव घालण्याचे निवेदन राष्ट्रीय किसान मोर्चा च्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांना देण्यात आले. सोबत निवेदनामध्ये राज्य सरकारने काढलेल्या उत्पादन खर्चावर आधारित सर्व शेतमालाला हमीभाव मिळावा, राज्य सरकारने केलेली शिफारस आणि केंद्र सरकारने जाहीर केलेला भाव यातील फरकाची रक्कम महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी काळात देण्यात यावी,शेतीचे सर्व थकीत वीजबिल शून्य करावे आणि इथून पुढे शेतीमध्ये २४ तास व मोफत वीज मिळावी तसेच सोलारची सक्ती रद्द करावी, सर्व शेतकऱ्यांना अतिवृष्टीपासून,जंगली वन्य प्राण्यापासून,बाजारातील भाव चढ उतार यापासून उत्पन्नात येणारी घट म्हणजे नुकसानभरपाई मिळण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना ऐवजी कायदा लागू करावा कारण कायदा लागू केल्याशिवाय शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही अशा मागण्या केलेल्या आहेत.

### नारंगवाडी परिसरात महावितरण कर्मचाऱ्यांची विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कसरत

आरंभ मराठी | नारंगवाडी

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी परिसरातील मागच्या काही दिवसात हवामान बदलामुळे सतत अवकाळी पाऊस व सोसाट्याचा वारा सुटून सर्वत्र पाणीच पाणी झालेले आहे. ओढे–नाले तुडूंब भरून वाहायला लागले। आहेत. अचानकपणे अवकाळी पाऊस व सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे अनेक गावांमध्ये, शेतामध्ये वाऱ्याने झाडे मोडून पडल्यामुळे विद्युत तारा तुटल्या आहेत तर काही ठिकाणी खांब मोडले आहेत. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये विजेचे खांब मोडून पडलेले आहेत. त्यामुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांना रात्री बेरात्री पावसात, चिखलात, चिखल तुडवत जाऊन ग्रामस्थांना लाईट चालू करून द्यावी लागत आहे. माडज शाखेचे कनिष्ठ अभियंता आलीम सय्यद, प्रधान तंत्रज्ञ जेके कुंभार तसेच वरिष्ठ तंत्रज्ञ गुणवंत कांबळे, तानाजी जाधव, विश्वजीत कुंभार, शपिका पठाण, मंथन बिराजदार, अजित शिंदे, मारुती सोनखेडे, भालचंद्र चिरे हे कर्मचारी परिसरात वीज वेळेवर देण्याचा प्रयत्न करत आहेत. मुसळधार पावसात विद्युत पुरवठा सुरळीत करताना महावितरणच्या कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.